पुढारी

# ‘वाघ अभियांत्रिकी’च्या विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारे निवड

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हद्वारे नोकरीची संधी प्राप्त केली. रसायन आणि रोबोटिक्स व ऑटोमेशन शाखांमधून एकूण ५५ विद्यार्थ्यांची विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली. विद्यार्थ्यांना सरासरी साडेचार, तर कमाल साडेआठ लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ३३ मुले आणि २२ मुलींचा समावेश आहे. प्लेसमेंटमध्ये २५ हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी सहभाग घेतला होता.



**नाशिक : प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये रोजगारप्राप्त के. के. वाघ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसमवेत डॉ. पी. के. शहाबादकर, डॉ. एस. एन. जैन, डॉ. पी. जे. पवार आदी.**

निवडप्रक्रिया विविध टप्प्यांत पार पडली. त्यामध्ये अभियोग्यता चाचणी, समूह चर्चा, तांत्रिक व वैयक्तिक मुलाखती यांचा समावेश होता. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांसाठी रोजगार कौशल्य वाढवणाऱ्या उपक्रमांचे आयोजन केले होते. त्याचे फलित म्हणून विद्यार्थी उद्योग जगतात आत्मविश्वासाने उभे राहू शकले, अशी माहिती ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट अधिकारी डॉ. पी. के. शहाबादकर यांनी दिली. प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर म्हणाले की, विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास करून समाजाभिमुख अभियंते घडवण्याचे कार्य महाविद्यालय करत आहे. विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. एस. एन. जैन, डॉ. पी. जे. पवार, प्रा. पीयूष जोशी, प्रा. विशाल गलांडे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

Nashik Edition
Jul 23, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com